N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0104 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 24/04/2026 20:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 22/04/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 24/04/2026

**Time From (वेळेपासून):** 14:39 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:34 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 24/04/2026 **Time (वेळ):** 20:02 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 036

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 24/04/2026 20:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भुजल ,सर्वेक्षण विकास यंत्रणा महा,राज्य यांचे वरिष्ठभुवैज्ञानिक , कार्यालयाती श्री जगताप यांचे, कक्ष क्रमांक 330शिवाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुहास गणेशराव हट्टेकर
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9881873330

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रियका संदीपान घुले | | | 1. फ्लट नंबर 703,कुमार प्रिन्स व्हिले ,जाधववाडी मोशी पुणे, चिखली,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | दिवाकर नामदेवराव धोटे | | | 1. वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल ,सर्वेक्षण विभाग पुणे,शिवाजी नगर,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | दोन लाख रुपये | 200,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

200,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद तारीख 24/04/2026

मी सुहास गणेशराव हट्टेकर, वय- 37 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे मो नं 9881873330

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 22/04/2026 रोजी 12.00 वा मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.सतिश वाळके, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार संदीप ज्ञानोबा उंद्रे, वय 46 वर्षे, व्यवसाय- बांधकाम भागीदार, ब्राईटइरा बिल्डस, रा. मांजरी खुर्द, ता. हवेली, जि. पुणे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. व सदर कारवाई करीता मनपा पुणे कार्यालय पुणे येथील पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षात घेवुन जावुन त्यांची तक्रार ऐकुन घेतली. त्यानंतर 14.00 वा चे सुमारास पंच लाप्रवि कार्यालयात आमचे कक्षात आले, त्यांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी त्यांची नावे 1) अजय गोविंदराव वाघमारे, वय 48 वर्षे, पद-वरिष्ठ लिपीक, मध्यवर्ती भांडार विभाग, पुणे मनपा, रा. 406,आयरिस टॉवर स्काय मानसलेक सोसायटी भुकुम ता.मुळशी जि.पुणे मो.न.9096055599 पंच 2) स्नेहल धनंजय उकरंडे वय 58 वर्षे, पद प्रशासन अधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), पुणे मनपा रा. जोशी संकुल पेपर गल्ली वर्तक तापकिरी कारखान्याजवळ,शनिवार पेठ पुणे मो.न. 9762153959 असे सांगितले.त्यांची तक्रारदार संदीप उंद्रे व सापळा पथकातील अंमलदार मसफौ श्रीगार मॅडम, मपोशि शेट, पोशि/महामुलकर यांचेशी ओळख करून दिली. तक्रारदार यांनी त्यांची तक्रार तोडी सांगितली. तसेच स्वतहस्ताक्षरात लिहून दिली.ती थोडक्यात पुढीलप्रमाणे,

तक्रारदार यांची भागीदारीमध्ये ब्राईटइरा बिल्डस फर्म असुन त्यांनी मौजे केसनंद गट नं.144 ता. हवेली, जि. पुणे येथे रहिवासी व अँमेनिटी स्पेस बिल्डींगचे बांधकाम केले आहे सदर बांधकाम प्रकल्पातील अँमेनिटी स्पेस बिल्डींगचे बांधकाम पुर्ण झाले असुन सदर बिल्डींगचा बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळणेकामी दि.25/03/2026 रोजी पीएमआरडीए कडे ऑनलाईन माध्यमातुन अर्ज दाखल केला आहे. त्यानंतर सदर कार्यालयातील अधिका-यांकडुन माहिती प्राप्त झाली की, त्यांनी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळणेकामी हायड्रोजिओलॉजिकल सव्हे अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे.

त्याअनुशंगाने तक्रारदार यांनी दि.06/04/2026 रोजी आपले सरकार पोर्टलवरुन ऑनलाईन पद्धतीने हायड्रोजिओलॉजिकल सव्हे अहवाल मिळणेकामी भुजल सर्वेक्षण विभागाकडे अर्ज दाखल केला. तसेच त्याबाबतची फी देखील ऑनलाईन भरली. परंतु त्यांना दि.07/04/2026 रोजी मोबाईल नं.9970284505 यावरुन कॉल आला. त्यांनी त्यांचे नाव श्री. माळी असे सांगितले व ते भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभाग पुणे येथुन बोलत असल्याचे सांगितले. व तक्रारदार यांना कार्यालयात येवुन लेखी अर्ज सादर करण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी दि.07/04/2026 रोजी भुजल सर्वेक्षण कार्यालयात जावुन लेखी अर्ज सादर केला व त्याची पोहोच घेतली.

दि.08/04/2026 रोजी तक्रारदार पुन्हा सदर कार्यालयात जावुन वरिष्ठ भुवैज्ञानिक श्री. दिवाकर धोटे यांना भेटले त्यांचे सांगणेप्रमाणे एसबीआय ट्रेझरी बँकेत जावुन 2500/-रूपयाचे चलन भरले व त्याची प्रत सदर कार्यालयात जमा केली.

त्याप्रमाणे भुवैज्ञानिक अधिकारी श्री. जगताप साहेब यांनी दि.20/04/2026 रोजी तक्रारदार यांचे साईटवर येवुन पाहणी करुन व काही कागदपत्रे घेवुन गेले व दि.21/04/2026 रोजी श्री. जगताप यांनी तक्रारदार यांना व्हॉट्सअँप मेसेज करुन त्यांचे कार्यालयातील घुले मॅडम यांना भेटणेस सांगितले.

त्याप्रमाणे दिंनाक 21/04/2026 रोजी तक्रारदार भुजल सर्वेक्षण विभागाचे कार्यालयात जावुन घुले मॅडम यांना भेटले असता व त्यांचे सव्हे अहवालबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे चौकशी करुन साहेबांना (दिवाकर धोटे) बोलते व तुम्हाला सांगते असे म्हणुन त्या साहेबांना(दिवाकर धोटे) यांना भेटुन आल्या व साहेबांनी 2,50,000/-(अडीच लाख रुपये) सांगितले आहेत. तुम्ही साहेबांना भेटुन घ्या व तुम्ही पैसे दिल्यानतर तुम्हाला तुमचा सव्हे अहवाल मिळुन जाईल,असे सांगितले.

परंतु तक्रारदार यांना लोकसेविका घुले मॅडम व श्री. दिवाकर धोटे, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना त्यांचा अहवाल देण्याकरिता अडीच लाख रुपये (2,50,000/-) लाच देण्याची ईच्छा नसलेने त्यांनी लाप्रवि विभागास तक्रार केली आहे.

त्यानंतर पंचानी व आम्ही सदर लेखी तक्रार वाचून त्यावर सहया केल्या आहेत.सदर तक्रारीचे अनुषंगाने दिंनाक 22/04/2026 रोजी पडताळणी कारवाई लाप्रवि पुणे कार्यालयातुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर मी,तक्रारदार व पंचास शासकीय सोनी कंपनीचा व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. एक नवीन सिंलबद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन पंचासमक्ष त्याची पाहणी केली असता, त्यावर बाजुस SanDisk ultra 32 GB A1 micro SD HC / दुसरे बाजुस 5482XX1410KQ 2523053063 BM MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले आणि पंचांना व तक्रारदार श्री.संदीप उंद्रे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मेमरीकार्डमध्ये यापुर्वी कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची त्यांची व पंचाची खात्री करून दिली. तसेच निवेदन व सापळा कारवाईचे चित्रीकरण व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये कारण्यात येणार असलेचे सांगुन शासकीय सोनी कंपनीचा व्हिडीओ कॅमेरा दाखविला व त्याकरिता वापरण्यात येणारे नवीन मेमरी कार्ड दाखविले त्यावर SanDisk 16 GB micro SD HC/ व त्याखाली 0137DVPH606C BL MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले.सदर मेमरी कार्ड व्हिडीओ कॅमेरामध्ये बसविले.व त्यामध्ये पुर्वीचे कुठलेही चित्रीकरण नसल्यांची खात्री करून दिली.

त्यानंतर तक्रारदार व पंच यांचे डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये निवेदन घेण्यात आले त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिग केले. तेव्हा 14.18 वाजले होते.त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने लोकसेविका श्रीमती घुले मॅडम व लोकसेवक श्री दिवाकर धोटे भुजल सर्वेक्षण कार्यालय शिवाजीनगर पुणे यांचेकडे लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याकरिता सुचना देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सूरू करून तक्रारदार यांचे बनियनला आतील बाजूस सेप्टी पीनच्या साहयाने लावून तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांना तक्रारदार यांचे टाटा नेक्सॉन ईव्ही कार क्रमांक. एम एच 12 वाय.एन. 9093 मधुन लोकसेवकाचे भुजल सर्वेक्षण कार्यालयात बोलणी करण्याकरिता रवाना केले तेव्हा 14.39 वाजले होते.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्रं 1 सापळा लाप्रवि कार्यालयात परत आले तेव्हा त्यांचा रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला तेव्हा 15.48 वाजले होते. तेव्हा तक्रारदार यांना पंच क्र 02 व 01 यांचेसमक्ष रवाना केल्यापासून येईपर्यत काय झाले याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि, “मी व पंच क्र.1 असे आम्ही लोकसेविका घुले मॅडम यांचे भुजल सर्वेक्षण कार्यालय शिवाजीनगर पुणे येथे गेले.घुले मॅडम आम्हाला कार्यालयाच्या खालीच भेटल्या त्यांनी मला संराना (दिवाकर धोटे साहेब) यांना भेटून घेण्याबाबत सांगितले त्यानंतर मी व पंच कार्यालयातील तिस-या माळयावर गेलो. तेथे लोकसेवक श्री धोटे साहेब यांचे कार्यालयामध्ये गेलो. तेथे साहेबाचे समोर बसुन बोलत असताना प्रथम माझे प्रकल्प व कामाविषयी बोलणी झाली त्यावेळी श्री धोटे साहेब यांनी मला “हअ....कस करायच” असे विचारले.तेव्हा मी सांगितले कि “तुम्हीच सांगायचं, मला मॅडम काल म्हणल्या होत्या..” “की साहेब म्हणल्यात एक अडीच लाखापर्यंत करा म्हणुन” तेव्हा धोटे साहेब यांनी “हअं ह” असे म्हणुन संमती दर्शवली.नंतर माझे कामाचे अनुषंगाने चर्चा झाली मी पुन्हा श्री धोटे साहेब यांना ... कसं करता येईल सर मं तुम्ही सांगा ना”असे विचारले असता श्री धोटे साहेबानी सांगितले कि, (हसुन) “बरं.... त्यांनी आता सांगितलय ...तर ...होईल”त्यावेळी मी त्यांना म्हणालो कि, “अडीच लाख रुपये सर खुप होतायेत, थोडे काय तरी कमी करा सर” त्यावेळी धोटे साहेब यांचे कार्यालयात इतर कर्मचारी आलेने ते काही बोलला नाही.कर्मचारी बाहेर गेल्यावर धोटे साहेब मला म्हणाले कि, “कसं करायचं”(व हसले ) व म्हणाले कि “पन्नास कमी करुन टाका” त्यावेळी मी धोटे साहेब यांना “दोन लाख का ?” असे विचारले असता त्यांनी “हम्म...” म्हणुन सांगितले तेव्हा मी श्री धोटे साहेब यांना “चालेल दोन लाखापर्यंत करतो म सर”असे बोललो असता श्री धोटे साहेब यांनी “बर” म्हणुन होकार दिला. त्यानंतर मी श्री धोटे साहेब यांना “पेमेंट कुठं घेवुन मं?”असे विचालरे असता धोटे साहेब यांनी “मॅडमकडे देवुन

टाका" असे सांगितले. तेव्हा मी "मॅडमकडे, घुले मॅडमकडे देवु का?" असे विचारले तेव्हा श्री धोटे साहेब यांनी
"हम्म" असे सांगितले असता मी पुन्हा "चालेल म" असे बोललो असता लोकसेवक श्री धोटे साहेब यांनी "चालेल
मी त्यांना सांगतो"(घुले मॅडम यांना ) असे सांगितले.त्यावेळी श्री धोटे साहेबांनी घुले मॅडम यांना बोलवुन घेवुन
माझा रिपोर्ट देण्याबाबत सांगितले. त्यावेळी मी धोटे साहेब यांना सांगितले कि, "चालेन चालेन,.... मला पण कॅशच
थोडसं हे करावं लागलं, त त एके अर्धा तास" तेव्हा श्री धोटे साहेब यांनी "ह चालेल" असे सांगितले.त्यावेळी मी श्री
धोटे साहेब यांना सांगितले कि," अर्धा तासात हे करतो म, तोपर्यंत त्यांचही होऊन जाईल मॅडमकडे देतो हअं..."
तेव्हा श्री धोटे साहेब यांनी "हो हो". म्हणुन संमती दिली.त्यांनतर मी श्रीमती घुले मॅडम यांना सांगितल कि,
"साहेबांनी तुम्हालाच भेटायला सांगितलय साहेबांनी रिपोर्टसाठी अन पेमेंटपण तुमच्याकडचं दयायला लावलय"तेव्हा
घुले मॅडम यांनी "हो" असे सांगितले.म्हणुन मी मॅडमला "तुमचं परत काय अँडीशनल दयायचय का काय करायचं?"
असे विचारले असता श्रीमती घुले मॅडम यांनी सांगितले कि, "माझं काहीच नाहीये, माझं काहीच नाहीये, फक्त ते मी,
जे येईन ते तिथुनच देणार अस",मग मी व पंच क्रमांक 01 असे तेथुन लाप्रवि कार्यालयात परत आलो. अशी माहिती
तक्रारदार यांनी पचं क्रमांक 2 यांचे समोर सांगितली. त्यानंतर पंच क्र. 1 श्री.संदीप वाघमारे यांना घडलेला
घटनाक्रम विचारला असता, त्यांनी ते तक्रारदार यांचे सोबतच होते. व त्यांनी तक्रारदार यांचे प्रमाणेच हकिकत
सांगितली. लोकसेवक श्री धोटे यांनी तक्रारदार यांचेकडे " दोन लाख रुपयेची मागणी करून सदर रक्कम श्रीमती घुले
मॅडम यांचेकडे देण्याबाबत सांगितले" असे सांगितले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण
फास्ट फॅारवर्ड करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती
प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली. लोकसेवक श्री दिवाकर धोटे यांनी तक्रारदार यांचेकडे 2,00,000/रुपये
(दोन लाख रूपये)लाच रक्कम मागणी करून ती श्रीमती घुले मॅडम यांचकडे देण्याबाबत सांगुन व श्रीमती घुले
यांनी ती स्वीकारण्याची तयारी दर्शवुन व ती घेवुन येण्याबाबत सांगितल्याची खात्री झाली.
त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक श्री धोटे व श्रीमती घुले यांनी लाच मागणी केलेल्या रकमेबाबत विचारणा केली
असता, तक्रारदार श्री.संदीप उंद्रे यांनी त्यांच्या कारमध्ये असलेली 2,00,000/-(दोन लाख) रु. रक्कम आमचे व
पंचासमक्ष हजर केली. त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 400 भारतीय चलनी नोटा असे एकुण 2,00,000/- रु.
एकुण 4 बंडल असलेचे दिसुन आले. सापळा पथकातील सर्व अंमलदारांचे मदतीने सदर नोटांचे नंबर स्वतंत्र
कागदावर लिहून त्यांवर पंचाची व माझी सही केली.
त्यानंतर पोहवा दिवेकर यांना कक्षात बोलावुन घेतले व त्यांनी पंच आणि तक्रारदार यांना अल्ट्राव्हॉयोलेट दिवा(टॉर्च)
व अँथ्रासिन पावडर दाखवून कार्यवाहीतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले. व प्रात्यक्षिक करून
दाखविले तक्रारदार यांनी लाचे करीता सादर केलेल्या नारंगी नोटांना व लिंफाफ्याना अँथ्रासीन पावडर लावली. व
प्रत्यकी 100 नोटाचे एक असे 4 बंडल तयार करून 2 नारंगी लिफाफ्यामध्ये 2 बंडल ठेवुन 2 लिफाफे तयार केले.
सदर अँथ्रासिन पावडर लावलेल्या नोटा लिफाफ्यासहीत तक्रारदार श्री संदीप उंद्रे यांचे पॅन्टचे समोरील बाजुच्या
उजव्या खिशात 1 लिफाफा व डाव्या खिशात 1 लिफाफा ठेवला. त्यानंतर पोहवा दिवेकर यांना प्रत्यक्ष सापळा
पथकातुन वगळण्यात आले.
त्यानंतर पोनि हट्टेकर यांनी सांगितले कि, लाच रक्कम स्वीकारलेनंतर ती हस्तगत करतेवेळी व लोकसेवक यांना
ताब्यात घेतेवेळी त्यांचे व्हीडीओ रेकॉर्डींग करणेत येणार आहे.अशी माहिती पंच,तक्रारदार व पथकास देवुन सोनी
कंपनीचा व्हिडीओ कॅमेरा मपोशि/शेटे यांचे ताब्यात दिला. व त्यांना योग्य त्या सुचना दिल्या.व लोकसेविकेने किवा
लोकसेवकाने लाच रक्कम स्वीकारल्यानंतर तक्रारदार यांनी डावा हात डोक्यावर फिरवुन लाच रक्कम
स्वीकारलेबाबतचा इशारा करणेबाबत सुचना दिल्या. सापळा पथकातील सर्वाना काम समजावुन सुचना देण्यात
आल्या. तक्रारदार व पंच यांचे निवेदन घेण्यात आले व त्याचे व्हिडीओ रेकॉडिग करण्यात आले आहे. तेव्हा 17.15
वाजले होते.त्यांनतर पंच क्रमांक 02 सापळा पथकातील अंमलदार असे सापळा कारवाईकरिता आवश्यक असलेले
साहीत्यासह सरकारी वाहन क्रमांक एम एच 12 युसी 4105 यामध्ये बसले व तक्रारदार व पंच क्रमांक 01 असे
तक्रारदार यांचे कार मध्ये बसुन लाप्रवि कार्यालयातुन रवाना झालो 17.25 वाजले होते.दोन्ही वाहने वाकडेवाडी
भुयारी मार्गाचे अलिकडे थांबले तेव्हा मी व्हाईस रेकॉर्डर सुरू करून ते ऐका सेफटी पिनच्या साहयाने तक्रारदार यांचे
बनीयानचे आतील बाजुस लावुन दिला. तक्रारदार व पंच क्रमांक 01 श्री संदीप वाघमरे यांना लोकसेविका घुले
मॅडम व लोकसेवक श्री धोटे यांचे भुलज सर्वेक्षण विभाग शिवाजी नगर या कार्यालयात लाचेची रक्कम देण्याकरिता
तक्रारदार यांचे कार क्रमांक एम एच 12 वाय. एन.9093 यामधुन 17.46 वा रवाना केले. त्याचे मागोमाग मी व
सापळा पथक, पंच क्रमांक 2 श्रीमती उंकरंडे यांचे सह सरकारी वाहनाने भुजल सर्वेक्षण कार्यालय शिवाजीनगर चे
परिसरात आमची गाडी लावून कार्यालयाचे आजूबाजूला जावून थांबलो होतो.तक्रारदार व पंच गाडीतुन उतरून
भुजल सर्वेक्षण विभागाचे कार्यालयाचे इमारतीजवळ गेले व तेथे जातानाच त्याना एक इसम भेटला ते त्यांचेशी बोलत

होते नंतर तक्रारदार व पंच असे पुन्हा त्याचे कारमध्ये येवुन बसले. व कार बाहेर घेवुन आले व आम्हाला तक्रारदार यांनी हाताने पाठीमागे येण्याबाबत इशारा केला. व शिवाजीनगर कडे जाणारे रोडवर काही अंतरावर कार रोडचे बाजुला पार्क करून फोनवर कोणाशीतरी बोलत होते. नंतर आम्ही तक्रारदार यांचा व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला तेव्हा 18.01 वाजले होते.

त्यावेळी आम्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना काय घडले याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि लोकसेवक धोटे व लोकसेविका घुले मॅडम या कार्यालयात नव्हते म्हणुन मी त्याचे कर्यालयातील शिपाई यांचेकडून मोबाईल नंबर घेवुन कॉल करून खात्री केली असता ते दोघेही घरी गेले आहेत.व त्यांनी परवा दिंनाक 24/04/2026 रोजी पेमेंट देण्याकरिता येण्याबाबत सांगितले आहे.त्यामुळे सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करून दिनाक 24/4/2026 रोजी करण्याचे ठरले व लाच रक्कम माझे ताब्यात घेतली. झाले कारवाईबाबत लाप्रवि कार्यालयामध्ये येवुन सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

लोकसेविका श्रीमती घुले यांनी दिंनाक 24/06/2026 रोजी कार्यालयात येण्याबाबत सांगितलेने सर्व सापळा पथक व पंच असे सर्वजण सकाळी 10.00 वा लाप्रवि कार्यालयात हजर झालो. त्याचवेळेस तक्रारदार देखील हजर झाले. त्यावेळी तक्रारदार यांनी पंचासमक्ष सांगितले कि,दिंनाक 23/04/2026 रोजी लोकसेविका घुले यांचा सायंकाळी 16.03 वा त्यांना व्हाटस्अप कॉल आला व त्यांनी दिंनाक 24/04/2026 रोजी 200000/- (दोन लाख) रूपये घेवुन येण्याबाबत सांगितले.त्यांनी सदर व्हॉटसअप कॉलचा स्क्रीनशॉट देखील सादर केला.त्यावेळी सापळा कारवाईचे अनुषंगाने मी तक्रारदार यांची माझेकडे सुरक्षित ठेवलेली 2,00,000/-रूपये (दोन लाख)लाच रक्कम हजर केली. सापळा कारवाईचे अनुषंगाने पुन्हा सुचना देवुन तक्रारदार व पंच याचे सापळापुर्व निवेदन घेतले. त्याचे मपोशि शेटे यांनी व्हिडीओ रेकॉर्डिंग केले तेव्हा 10.44 वाजले होते.

माझे सुचनेप्रमाणे पोहवा दिवेकर यांनी तक्रारदार व पंच यांना पुन्हा अँथ्रॅसीन पावडरचे गुणधर्म सांगुन प्रात्यक्षिक करून दाखविले. व सदर नोटांना व लिफाफ्याला पुन्हा अँथ्रॅसीन पावरडर लावुन लाचेची रक्कम असलेले लिफाफयापैकी तक्रारदार यांचे पॅन्टचे उजवे खिशात 1 व डावे खिशात 1 लिफाफा ठेवला. व पुन्हा सर्वाना सुचना देवुन पंच क्रमांक 02 सापळा पथकातील अंमलदार असे सापळा कारवाईकरिता आवश्यक सर्व साहीत्यासह सरकारी वाहन क्रमांक एम एच 12 युसी 4109 यामध्ये बसले व सापळा पथकातील आम्ही व तक्रारदार व पंच क्रमांक 01 असे तक्रारदार यांचे कार मध्ये बसुन लाप्रवि कार्यालयातुन रवाना झालो. तेव्हा 11.00 वाजले होते.दोन्ही वाहने वाकडेवाडी

भुयारी मार्गाचे अलिकडे थांबले.तेव्हा मी व्हाईस रेकॉर्डर सुरू करून होल्ड मोडवर ठेवुन एका सेफटी पिनच्या साहयाने तक्रारदार श्री उंद्रे यांचे बनीयानचे आतुन लावुन दिला. तक्रारदार व पंच क्रमांक 01 श्री संदीप वाघामारे यांना लोकसेविका घुले मॅडम व लोकसेवक श्री धोटे यांचे भुलज सर्वेक्षण विभाग शिवाजी नगर या कार्यालयात लाचेची रक्कम देण्याकरिता तक्रारदार यांचे कार क्रमांक एम एच 12 वाय. एन.9093 यामधुन 11.16 वा रवाना केले. त्याचे मागुन सापळा पथक, पंच क्रमांक 2 श्रीमती उंकरंडे यांचे सह सरकारी वाहनाने भुजल सर्वेक्षण कार्यालय शिवाजीनगर चे परिसरात आमची गाडी लावून कार्यालयाचे आजूबाजूला व कार्यालयातील लोकसेवक बसत असेल्या तिस-या माळयावर जावून थांबलो.प्रथम तक्रारदार व पंच हे त्याचे कार्यालयात गेले. आम्ही जिन्यावर व खाली थांबुन राहीलो.

काही वेळाने तक्रारदार यांनी लोकसेविका घुले मॅडम यांचे कार्यालयातुन बाहेर येवुन डोक्यावरून डावा हात फिरवुन लोकसेवका◌ाने लाच रक्कम स्वीकारलेबाबत इशारा केलेने मी तसेच सफो श्रीगार मॅडम व इतर सापळा पथक तत्काळ लोकसेविका घुले यांचेकक्षाजवळ गेलो तेथे पं◌ंच्र क्रमांक 01 यांनी एक महीलेकडे इशारा करून लोकसेविका प्रिंयका घुले असलेचे सांगितले. महीला पोलीस श्रीगार मॅडम यांनी त्यांना जागीच ताब्यात घेतले. तेव्हा पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला तेव्हा 11.34 वाजले होते. पंच क्रमांक 2 व इतर सापळा पथक देखील आले.त्यावेळी लोकसेविकेस त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव प्रिंयका संदीपान घुले वय 39 वर्ष पद कनिष्ठ भुवैज्ञानिक रा.फ्लॅट नंबर 703,कुमार प्रिन्स व्हिले जाधववाडी मोशी पुणे असे सांगितले.पंच क्रमांक 01 श्री वाघमारे यांना लोकसेविका यांनी लाच रक्कम कोठे ठेवली यांबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि,लोकसेविका यांना मला त्याचे कक्षाचे बाहेर थांबण्याबाबत सांगितले त्यांनतर त्या तक्रारदार यांना श्री जगताप यांचे कक्षात घेवुन गेल्या. तेव्हा मी तेथेच बाहेर उभा राहून बघत होतो.त्यावेळी जगताप यांचे केबीनचे टेबलावरील फाईलमध्ये तक्रारदार यांनी लाच रकमेचे लिफाफे ठेवले ते मी पाहीले.त्यांनतर ते दोघेही बाहेर येवुन घुले मॅडमचे कक्षात बसले.असे सांगितले.

त्यांनतर व्हिडीओ रेकॉर्डिंग सुरु करून पंच क्रमांक 02 व 01 यांचे समक्ष लोकसेविका घुले मॅडम यांना लाच रकमेबाबत विचारले असता त्यांनी, बाजुचे रूममध्ये ठेवलेली असलेबाबत सांगितले. लोकसेविका घुले मॅडम ,

पंचासह जगताप नावाची पाटी असलेले कक्ष क्रमाक 303 मध्ये गेलो असता सदर टेबलचे खालचे कप्प्यात असलेली एक फाईल काढली. फाईल वर काढताना त्यामधिल 1 लिफाफा खाली जमीनीवर पडला.एक लिफाफा फाईलमध्ये होता. दोन्ही लिफाफे पंच क्रमॉक 02 यांनी ताब्यात घेवुन पाहीले असता नारंगी लिफाफ्यात 500 रूपये दाराच्या एकुण 400 चलनी नोटा दिसुन आल्या.त्या बाहेर काढले असता एकुण 4 बंडल होते. तेथे कक्षात क्रत्रिम अंधार करून अॅल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात पाहीले असता नोटांवर व लिफाफयावर अँथ्रेसीन पावडरची चकाकी दिसुन आली. तसेच जगताप यांचे कक्षातील जांभळे रंगाचे बॉक्स फाईल ज्यामध्ये लाच रकमेचे लिफाफे ठेवले होते त्या फाईलमध्ये देखील अँथ्रेसीन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यनंतर पंच क्रमांक 02 यांनी यापुर्वी कागदावर लिहेल्या नोटांचे नबंर व प्रत्यक्ष नोटाचे नंबरची पाहणी केली असता ते एकच असल्याची खात्री झाली. त्यांनतर अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तक्रारदार यांची पॅन्टचे दोन्ही खिशाची व हाताची पाहणी केली असता अँथ्रेसीन पावडर दिसुन आली. त्यानंतर लोकसेवक श्री दिवाकर नामदेवराव धोटे वय 43 वर्ष वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण विभाग पुणे हे कार्यालयाचे खाली अलेचे समजलेने खाली जावुन त्यांना ताब्यात घेवुन . त्यांना देखील कार्यालयाचे तिस-या माळयावर घेवुन आलो.

त्यानंतर पंचासमक्ष तक्रारदार यांना रेकॉर्डर लावलेपासुन बंद करेपर्यत काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले कि,ते व पंच लोकसेविका घुले मॅडम यांचे कक्षात गेले असता त्यांनी “जगताप सरांच्या रुममध्येच या.. बाजुलाच हे..ऑफीस” असे म्हणुन मला जगताप सराचे कक्षात नेले.व पंच यांना उददेशुन यांना इथ बसु दया.. जगताप सरांच्या शेजारच्या रुममध्ये बसा, आलेच मी.. .असे सांगुन पंचाना बाहेर थांबवले व आम्ही जगताप सराचे कक्षात गेलो.तेव्हा पंच क्रमांक 01 आम्हाला पाहत होते. तेथे मी लोकसेवक घुले मॅडम यांना “पेमेंट कुठे ठेऊ.. मॅडम” असे विचारले असता लोकसेविका घुले मॅडम यांनी, “हयाच्यात ठेऊन दया .. (टेबलावरील फाईलवर हात आपटुन)” जांभळे रंगाचे बॉक्स फाइलमध्ये पैसे ठेवण्यास सांगितले व कक्षाचे बाहेर गेल्या व परत आत येवुन मला विचारले कि “ठेवले का” तेव्हा मी मॅडम ला बोललो कि “नाही तुम्ही बाहेर गेला म्हणुन...” तेव्हा लोकसेवक घुले मॅडम यांनी “ठेवा म्हटल होत ना तुम्हाला”असे सांगितले. म्हणुन मी लोकसेविका घुले मॅडम यांना “ठेवु का फाईलमध्ये मॅडम याच्यामध्ये 1 लाख रुपये हे अणि मॅडम... याच्यामध्ये 1 लाख आणि 1 लाख याच्यामध्ये 2 लाख रूपये ....ठेवलेत फाईलमध्ये” असे सांगितले असता लोकसेविका घुले मॅडम यांनी “ठीक ..चला माझ्या रुममध्ये” असे बोलल्या तेव्हा मी घुले मॅडम यांना “मोजून घ्या बरका मॅडम” असे म्हणालो असता लोकसेवक घुले मॅडम यानी “नाही मी त्याला हात पण नाही लावणार याच्यावर सही दया तुमची” असे सांगुन 200000/रूपये( दोन लाख रूपये) लाच रक्कम ठेवलेली फाईल टेबलाचे खालील कप्प्यात ठेवुन दिली. व आम्ही मॅडमचे कक्षात आलो त्यांनतर मी सही करून बाहेर येवुन लाच रक्कम स्वीकारलेबाबत डोक्यावरून डावा हात फिरवुन पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर आम्ही पंच क्रमांक 01 यांना देखील विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांचेकप्रमाणे मिळती जुळती हकीगत सांगितली.त्यांनतर आम्ही पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता तक्रारदार व पंचानी सांगितलेप्रमाणे हकीगत बरोबर आहे. सदर झाले कारवाईचा सविस्तरपणे पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी आरोपी लोकसेविका प्रिंयका संदीपान घुले यांनी तक्रारदार यांनी दिंनाक 07/04/2026 रोजी भुजल सर्वेक्षण अहवाल मिळण्याचे अनुषंगाने केलेल्या अर्जाचा भुजल सर्वेक्षण अहवाल देण्याकरिता प्रथम 2,50,000/- रूपये (दोन लाख पन्नास हजार) लाचेची मागणी केली होती. आरोपी लोकसेवक श्री दिवाकर नामदेवराव धोटे वय 53 वर्ष वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण विभाग पुणे यांनी दिंनाक 22/04/2026 रोजी पडताळणी दरम्यान तक्रारदार यांना भुजल सर्वेक्षण अहवाल देण्याकरिता तडजोडीअंती 200000/- (दोन लाख )रूपये लाच मागणी करून ती लोकसेविका प्रिंयका घुले यांचेकडे देण्याबाबत सांगितले. लोकसेविका प्रिंयका संदीपान घुले वय 39 वर्ष पद कनिष्ठ भुवैज्ञानिक रा.फ्लॅट नंबर 703,कुमार प्रिन्स व्हिले जाधववाडी मोशी पुणे यांनी वरिष्ठ भुवैज्ञानिक श्री दिवाकर धोटे यांनी सांगितले प्रमाणे 200000/- रूपये(दोन लाख) लाच रक्कम स्वीकारण्यास होकार दिला. परंतु दिंनाक 22/04/2026 रोजी उशीर झालेने ते कार्यालयातुन गेलेने फोनदवारे विचारणा केली असता लाच रक्कम देण्यासाठी दिंनाक 24/04/2026 रोजी कार्यालयात येण्याबबत सांगितले. तसेच दिंनाक 23/04/2026 रोजी लोकसेविका घुले यांनी तक्रारदार यांना व्हाटस्अप कॉल करून दिंनाक 24/04/2026 रोजी कार्यालयात पैसे घेवुन येण्यास सांगितले.त्याप्रमाणे दिंनाक 24/04/2026 रोजी 11.34 वा चे सुमारास लोकसेविका घुले यांनी तक्रारदार यांचेकडून आयुक्त भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा महाराष्ट्र राज्य यांचे शिवाजीनगर पुणे येथिल तिस-या मजल्यावरील वरिष्ठ भुवैज्ञानिक कार्यालयातील श्री जगताप यांचे कक्ष क्रमांक 330 यामध्ये 200000/- रूपये (दोन लाख) लाच रक्कम स्वीकारली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले. तसेच लोकसेवक दिवाकर नामदेवराव धोटे वय

53 वर्ष वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण विभाग पुणे यांनी सरकारी पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांना भुजल सर्वेक्षण अहवाल देण्याकरिता म्हणुन 2,00,000/रू(दोन लाख) लाच रक्कम मागणी करू.न ती लोकसेविका घुले यांचकडे देण्यास सांगितले. म्हणून माझी लोकसेविका प्रियका संदीपान घुले वय 39 वर्ष पद कनिष्ठ भुवैज्ञानिक रा. प्लॉट नंबर 703,कुमार प्रिन्स व्हिले जाधववाडी मोशी पुणे व लोकसेवक दिवाकर नामदेवराव धोटे वय 53 वर्ष वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण विभाग पुणे याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 चे कलम 7,12 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फियाद आहे.

माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

समक्ष हा फिंयादी जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Pramod Mahadev patil
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर

**Name (नाव):** GIRISH VISHWASRA

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** POBN83692